Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date 11 November 2024

Time 11.00 to 11.05 AM

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक: ११ नोव्हेंबर २०२४ सकाळी ११.०० वाजता.**

****

देशाचे एकावन्नावे सरन्याधीश म्हणून न्यायमूर्ती संजीव खन्ना यांनी आज पदभार स्वीकारला. राष्ट्रपती दौपदी मुर्मू यांनी राष्ट्रपती भवनात झालेल्या सोहळ्यात त्यांना पद आणि गोपनीयतेची शपथ दिली.

****

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मौलाना अबुल कलाम आझाद यांना जयंतीनिमित्त आदरांजली वाहिली आहे. मौलाना आझाद यांना ज्ञानाचा प्रकाश आणि स्वातंत्र्य चळवळीतील त्यांच्या भूमिकेसाठी स्मरणात ठेवले जाते असं पंतप्रधानांनी सामाजिक माध्यमावरील संदेशात म्हटलं आहे. मौलाना अबुल कलाम आझाद हे सखोल विचार करणारे आणि यशस्वी लेखक होते. विकसित आणि सशक्त भारताच्या त्यांच्या संकल्पनेतून सरकार प्रेरित असल्याचे पंतप्रधान म्हणाले.

****

झारखंड विधानसभेच्या पहिल्या टप्प्यात १३ नोव्हेंबर रोजी ४३ जागांसाठी मतदान होणार आहे. त्यासाठी आज सायंकाळी प्रचार थांबणार आहे. भाजपनेते, पंतप्रधान नरेंद्र मोदी दुपारी १२ वाजता पक्षा कार्यकर्त्यांशी दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून संवाद साधणार आहे. राष्ट्रीय लोकशाही आघाडी आणि इंडिया आघाडींनी जोरदार प्रचार केल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

वायनाड लोकसभा पोटनिवडणुकीसाठीही आज प्रचार थांबणार आहे. युनायटेड डेमोक्रेटीक फ्रंटकडून काँग्रेस उमेदवार प्रियंका गांधी निवडणूक लढवत आहेत. तर, भाजपकडून नव्या हरिदास आणि लेफ्ट डेमोक्रेटीक फ्रंटचे उमेदवार सत्यन मोकेरी यांच्यात तिरंगी लढत आहे.

****

राज्यातही विधानसभा निवडणुकीसाठी प्रचारानं वेग घेतला आहे. शिवसेना नेते, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आज जालना जिल्ह्यात सायंकाळी साडेचार वाजता महायुतीच्या उमेदवारांसाठी प्रचारसभा घेणार आहेत. तर, भाजपनेते उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस नागपूर, गोंदीया आणि मुंबईत प्रचारसभा घेणार आहेत. महाविकास आघाडीतील ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या आज धुळे आणि जळगाव जिल्ह्यात प्रचारसभा आयोजित करण्यात आल्या आहेत.

****

रिपब्लीकन पक्षाचे नेते केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांनी लातूर शहर मतदारसंघातील भाजपा महायुतीच्या उमेदवार डॉ. अर्चना पाटील चाकूरकर यांच्या प्रचारार्थ सभा घेतली. तर, महाविकास आघाडीचे उमेदवार आमदार राजेश टोपे यांच्या प्रचारार्थ राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते शरद पवार यांची घनसावंगी इथं जाहीर सभा झाली.

****

अकोल्यात आजपासून गृहमतदानाला सुरुवात झाली. श्रीवल्लभ देशपांडे या 98 वर्षीय मतदारानं आपला मतदानाचा हक्क आज बजावला. परभणी जिल्ह्यातही 85 वर्षांपेक्षा जास्त वयाच्या १८७ मतदार आणि ६७ दिव्यांग मतदारांनी गृह मतदानासाठी नोंदणी केली आहे. येत्या १४ ते १६ तारखेदरम्यान जिल्ह्यात गृह मतदान होणार असून, यासाठी सहा मतदान पथकं नियुक्त करण्यात आली आहेत.

****

मुंबईच्या विक्रोळी उपनगर परिसरात निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पोलिस आणि निवडणूक आयोगाच्या भरारी पथकानं साडेसहा टन वजनाच्या चांदीच्या विटा असलेली  व्हॅन जप्त केली आहे. मुलुंडमधल्या एका गोदामात त्या नेण्यात येत होत्या. निवडणूक आयोग, आयकर विभाग आणि पोलिस या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत.

****

कोल्हापूर दक्षिण विधानसभा मतदारसंघात प्रचार सभेमध्ये आक्षेपार्ह विधान केल्याच्या कारणावरुन खासदार धनंजय महाडिक यांच्यावर आचारसंहितेचे उल्लंघनचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दक्षिण कोल्हापूर मतदारसंघाच्या निवडणूक अधिकार्यांना महाडिक यांनी खुलासा सादर केला, मात्र त्यांचा खुलासा अमान्य करत गुन्हा दाखल करण्याचे आदेश जिल्हा निवडणूक अधिकार्यांनी  भरारी पथकातील संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

****

नागपूरच्या धरमपेठ परिसरात ३७ लाख ७१ हजार रुपये किमतीचा महागड्या विदेशी मद्याचा साठा आणि अन्य मुद्देमाल जप्त केला आहे. राज्य उत्पादन शुल्क विभागाने सिताबर्डी पोलिस ठाण्याच्या हद्दीत ही कारवाई केली. महाराष्ट्रात विक्रीसाठी प्रतिबंधित असलेला हा मद्यसाठा हरियाणामधून आणल्याचे उघडकीस आले आहे. या प्रकरणी पोलिसांनी एकाला अटक करुन त्याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

****

ज्येष्ठ दाक्षिणात्य अभिनेते दिल्ली गणेश यांचं काल  चेन्नई इथं वार्धक्यानं निधन झालं. ते ८० वर्षांचे होते. पाच दशकांच्या कारकिर्दित त्यांनी विविध भाषांमधल्या ४०० पेक्षा जास्त चित्रपटांमधे भूमिका केल्या. दस, अजब प्रेम की गजब कहाणी, चेन्नई एक्सप्रेस या हिंदी चित्रपटांमधूनही त्यांनी काम केलं होतं. नाटक आणि चित्रपटांबरोबरच छोट्या पडद्यावरही विविध मालिकांमधे त्यांनी अभिनय केला होता. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गणेश यांच्या निधनावर शोक व्यक्त केला आहे.

****

छत्रपती संभाजीनगर इथं जिल्हा जिम्नॅस्टिक्स संघटनेच्या वतीनं घेण्यात येत असलेल्या आर्टिस्टिक जिम्नॅस्टिक्स राज्य अजिंक्यपद स्पर्धेत मुलींच्या वरिष्ठ गटात छत्रपती संभाजीनगर साईच्या सिद्धी हत्तेकरनं सुवर्णपदक पटकावलं. मुंबई उपनगरची अनुष्का पाटील हिनं रौप्य, तर पुण्याच्या सताक्षी टक्के हिनं कांस्यपदक जिंकलं. छत्रपती संभाजीनगरच्याच रिद्धी हत्तेकर हिनं फ्लोअर एक्सरसाईजवर सुवर्ण आणि टेबल व्हॉल्ट या प्रकारात रौप्य पदकाची कमाई केली.

****

महिलांची आशियाई हॉकी अजिंक्यपद स्पर्धा आजपासून बिहारमधल्या राजगीर इथं सुरु होत आहे. मुख्यमंत्री नितीश कुमार यांच्या हस्ते या स्पर्धेचं उद्घाटन होणार आहे. या स्पर्धेत भारतासह चीन, जापान, मलेशिया, कोरिया और थाईलंड देशांचे संघ सहभागी आहेत. या स्पर्धा २० नोव्हेंबरपर्यंत चालणार असल्याची माहिती बिहार क्रीडा प्राधिकरणचे महासंचालक रवींद्रन शंकरन यांनी दिली.

****